# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १४६ वा ❑ बुधवार दि.२३ जुलै २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## भारताला धमकावणारा नाटो कोण आहे?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्यं

रशियासोबत तेल आणि वायूचा व्यापार सुरू ठेवल्यास भारत, चीन आणि ब्राझील यांना १००% कठोर शिक्षा देण्याचा इशारा नाटोचे प्रमुख मार्क रुट यांनी दिला आहे. रुटे यांनी अमेरिकन सिनेटरना भेटून रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यावर शांतता चर्चेसाठी दबाव आणण्यास सांगितल्यानंतर हे विधान आले आहे.आता प्रश्न असा आहे की, भारतासारख्या स्वतंत्र देशाला व्यापार धोरणांवर धमकावणारा नाटो कोण आहे? रुट म्हणाले की जर तुम्ही दिल्ली, बीजिंग किंवा ब्राझीलमध्ये असाल तर सावधगिरी बाळगा कारण हे तुमच्यासाठी महागडे ठरू शकते. ही धमकी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या रशियासोबत व्यापार करणाऱ्या देशांवर मोठ्या प्रमाणात कर लावण्याबद्दलच्या विधानानंतर आली आहे, परंतु आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे युरोप स्वतः रशियाकडून तेल खरेदी करत आहे, मग भारताला का लक्ष्य केले जात आहे?

नाटो ही एक लष्करी युती आहे ज्यांचे काम सामूहिक सुरक्षा आहे, जागतिक व्यापार रोखणे नाही. भारताला धमकावणे हे रुटच्या अधिकारक्षेत्राबाहेरचे आहे. भारताचा नाटोशी काहीही संबंध नाही, तरीही हे विधान ट्रम्पच्या धोरणांशी समन्वय दर्शवते. ट्रम्प ब्रिक्स देशांना अमेरिकाविरोधी मानतात आणि त्यांच्या चलनाला डॉलरसाठी धोका मानतात. रुटचे विधान ट्रम्पच्या दबावाखाली दिले गेले होते का? हा प्रश्न उद्भवणे साहजिक आहे. भारताला शांततेचा सल्ला का? रुटने भारताला पुतिनला फोन करून शांतता चर्चेसाठी दबाव आणण्यास सांगितले. हे विधान भारताच्या शांतता प्रयत्नांना दुर्लक्षित करते. पंतप्रधान नरेंद्र मोदी वारंवार म्हणाले आहेत की हा युद्धाचा काळ नाही. रशिया–युक्रेन युद्धात भारताने संतुलित दृष्टिकोन स्वीकारला आहे. २०२४ मध्ये मोदींनी पुतिन आणि अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांच्याशी बोललो आणि युक्रेनलाही भेट दिली. मग भारताला सल्ल्याची गरज का आहे?

भारताच्या व्यापार धोरणात नाटोचा हस्तक्षेप हा राजनैतिक मर्यादेचे उल्लंघन आहे. रुट यांचे विधान केवळ अपमानास्पदच नाही तर चुकीच्या व्यक्तीने दिलेला चुकीचा संदेश देखील आहे. भारताने नेहमीच आपल्या स्वतंत्र परराष्ट्र धोरणाला प्राधान्य दिले आहे. परराष्ट्र मंत्री एस जयशंकर म्हणतात त्याप्रमाणे, भारताला सल्ल्याची नव्हे तर भागीदारीची आवश्यकता आहे. अशा परिस्थितीत, नाटो आणि रुट यांना हे समजून घ्यावे लागेल की भारत कोणत्याही बाह्य दबावाशिवाय आपल्या ऊर्जा सुरक्षा आणि शांततेसाठी काम करतो. हा धोका केवळ चुकीचा नाही तर स्वतंत्र देशाच्या सार्वभौमत्वावरही प्रश्नचिन्ह उपस्थित करतो.

रशियाकडून स्वस्त तेल खरेदी करणे हा भारताचा आर्थिक निर्णय आहे जो ऊर्जा सुरक्षेसाठी आवश्यक आहे. परंतु रुटच्या धमकीवरून असे दिसून येते की पाश्चात्य देश भारतावर दबाव आणू इच्छितात तर युरोप स्वतः रशियाकडून तेल खरेदी करत आहे. रशिया–युक्रेन युद्धाच्या तिसऱ्या वर्षात, युरोपने रशियन तेल आयात केवळ १% ने कमी केली आहे. मग भारताला लक्ष्य का केले जात आहे?

ब्राझीलमधील ब्रिक्स शिखर परिषदेनंतर रुटचे विधान आले. पाश्चात्य देश ब्रिक्सच्या वाढत्या शक्तीबद्दल आणि पेट्रोडॉलरच्या पर्यायाच्या चर्चेबद्दल चिंतेत आहेत. ही धमकी शांततेपेक्षा ब्रिक्सच्या वाढत्या शक्तीला दाबण्याचा प्रयत्न असल्यासारखे दिसते.

भारत आपल्या ऊर्जेच्या गरजांसाठी रशिया तसेच मध्य पूर्व, आफ्रिका आणि अमेरिकेतून तेल खरेदी करतो. स्वस्त रशियन तेल देशांतर्गत किमती स्थिर ठेवण्यास मदत करते. हा भारताचा व्यावहारिक दृष्टिकोन आहे जो पाश्चात्य देशांच्या इच्छेनुसार बदलण्याची आवश्यकता नाही.






# मराठी पाऊल पडते पुढे....

ज्योतिर्मय साहित्य

**वेदांत घोडके याचा यशाचा प्रवास मराठी माध्यमातून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या क्षमतेला वाव देतो. मराठी शाळेत शिकूनही विद्यार्थी राज्यपातळीवर सर्वोत्तम कामगिरी करू शकतात, हे वेदांतने सिध्द केले. मराठी ही अभिजात भाषा असल्याने विचार, शंकेचे निरसन आणि बौद्धिक क्षमता अधिक विकसित होतात. मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने शब्दसंपत्ती आणि भावनिक जवळीक वाढते, ज्याचा अभ्यासावर सकारात्मक परिणाम होतो. वेदांतसारखी उदाहरणे इतर विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करतात. इंग्रजीपेक्षाही मातृभाषेतून शिक्षण घेणे हे आपल्या पाल्यांच्या बुद्धीमतेला जास्त चालना देते. तळमळ, अभ्यास आणि सर्व परीक्षेसाठी प्रयत्न महत्त्वाचे असतात. अतीशय गतिमान स्पर्धेमध्ये मराठी माध्यमाचे विद्यार्थी देखील प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होत आहेत.**






तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री विद्यालय, वाई येथील वेदांत राहुल घोडके हा विद्यार्थी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने घेतलेल्या २०२५ च्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत जी आठवीत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी घेतली जाते त्यामध्ये ३०० पैकी २९० गुण मिळवीत महाराष्ट्र राज्यात दुसरा आला. इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत राज्याचा प्रथम क्रमांक २९२ मार्काला आला आहे. ती बीड जिल्ह्यातली मुलगी आहे. एका प्रश्नासाठी त्याचं राज्यातलं पहिल्या नंबरच मेरीट हुकलं. वेदांतने पाचवी स्कॉलरशिप परीक्षेत ३०० पैकी २८८ गुण मिळवून राज्यात सहावा क्रमांक मिळवला होता. बीड जिल्ह्यातून प्रथम आलेली विद्यार्थिनी आणि वाई सारख्या छोट्याशा ग्रामीण–शहरी भागातून दुसऱ्या क्रमांकाने आलेला विद्यार्थी मराठी शाळेतच शिकत आहेत. मोठमोठ्या शहरातील सर्व सोयी उपलब्धता असणाऱ्या विद्यार्थांबरोबर स्पर्धा करीत त्यांनी मिळवलेले यश स्पृहणीय आहे. वेदांतचा इयत्ता आठवी

स्कॉलरशिप परीक्षेसाठी मार्कांचा टारगेट प्लॅन इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेच्या चार महिने अगोदर त्याने किती मार्क पाहिजे ते अभ्यास करायला बसतो तेथे भिंतीवर लिहून ठेवले होते. आणि तेवढेच मार्क त्याला पडले. वेदांत ब्रेन डेव्हलपमेंट परीक्षेला इयत्ता पहिली–दुसरी–तिसरी या वर्षात सलग तीन वर्षे गोल्ड मेडल मिळवून यशस्वी झाला. चौथी पाचवीला कोरोनामुळे परीक्षा झाली नाही.

परत सहावी–सातवी–आठवी ब्रेन डेव्हलपमेंट परीक्षेमध्ये त्याने गोल्ड मेडल मिळवले. सलग सहा वेळा वेदांत याने ब्रेन डेव्हलपमेंट परीक्षेला गोल्ड मेडल मिळवले. परत तो यंदा नववीला पण ब्रेन डेव्हलपमेंट परीक्षेला बसणार आहे. ही परीक्षा इयत्ता पहिलीपासून नववीपर्यंत असते. ब्रेन डेव्हलपमेंट परीक्षेला शंभर प्रश्न असतात प्रत्येक प्रश्न एका मार्काला असतो. गणित ५० मार्क ५० प्रश्न, बुद्धिमत्ता २५ मार्क २५ प्रश्न., विज्ञान २५ मार्क २५ प्रश्न.

इयत्ता पहिलीपासून ते आठवीपर्यंत वेदांत मंथन परीक्षेला बसला आहे. मंथनची परीक्षा ३०० मार्कांची असते.

या प्रत्येक परीक्षेत तो २८० ते २९० या रेंजमध्ये मार्क पाडून राज्याच्या पहिल्या सात नंबर मध्ये त्याने यश मिळवले आहे. अभिरूप शिष्यवृत्ती परीक्षा, ही परीक्षा त्याने सहावी–सातवी–आठवी मध्ये दिली. या परीक्षेमध्ये तो राज्याच्या मेरिट लिस्ट मध्ये पहिल्या पाच क्रमांकामध्ये होता. ही परीक्षा तीनशे गुणांची असते. वेदांतची आई संपदा राहुल घोडके या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पसरणी तालुका वाई येथे उपशिक्षक म्हणून कार्यरत आहेत.

त्यांनी प्ले ग्रुप पासून ते आजपर्यंत वेदांतचे मराठी व इंग्रजी विषय शाळेतल्या शिक्षकांनी शिकवल्यानंतर नोकरीला न्याय देत घरी उजळणी स्वरुपात करून घेतले. वेदांतला शिकवीत असताना त्याच्याकडून त्यांनी मराठीतून बोधात्मक गोष्टी सांगत प्रगती करून घेतली. त्यामुळे वेदांत लहानपणापासून शांत, नम्र आणि दिलेले काम प्रामाणिकपणे करतो.

वेदांतचे वडील राहुल घोडके आमच्या 'लोकमंगल ग्रुप' शिक्षण संस्थेच्या लोकमंगल हायस्कूल नागेवाडी–कुशी या ठिकाणी २० वर्षापेक्षाही जादा कालावधी पासून लिपिक या पदावर नोकरी करीत आहेत. वेदांतला पहिलीपासून ते आठवीपर्यंत त्यांनी गणित आणि बुद्धिमत्ता या विषयाचे ज्ञान दिलेले आहे.

नोकरी करीत असलेल्या माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना ते वेगवेगळ्या सर्व शासकीय आणि इतर योजनांचा लाभ मिळवून देत असतात.

वेदांतने इयत्ता सहावी मध्ये तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी विद्यालय वाई येथे प्रवेश घेतला. वेदांत इयत्ता पाचवी मध्ये असताना तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांच्या स्मरणार्थ जी यशवंत शिष्यवृत्तीची परीक्षा घेतली जाते, त्या परीक्षेला वाई तालुक्यातून प्रथम क्रमांक मिळवून दहा हजार रुपयेचे बक्षीस मिळविले.

त्यावेळी वेदांतला शंभर पैकी ९६ गुण मिळाले. वेदांतची पाचवी मध्ये सातारा सैनिक स्कूल मध्ये परीक्षा तसेच मेडिकल टेस्ट व मुलाखत होऊन त्याची सहावी साठी सातारा सैनिक स्कूलला निवड झाली होती. मराठी माध्यमाच्या शाळा विद्यार्थांना देत असलेले ज्ञान किती महत्वपूर्ण आणि त्यांच्या पुढील वाटचालीसाठी दिशादर्शक आहे हे वेदांत यासारख्या विद्यार्थ्यांमुळे आपल्याला समजते. आपण मराठी भाषिक म्हणून मराठी शाळेमध्ये आपल्या पाल्यांचे भविष्य चांगल्या पद्धतीने घडवू शकतो.

मेहनत करुनी तुला घडविले  
माता आणि पित्याने,  
उजळून आला यशोदीप हा  
तव अपार कष्टाने....  
संस्कारांचे शिंपण करुनी  
बीज रुजवीले ध्येयाचे,  
अभ्यासासी देव मानुनी  
दान मिळविले ज्ञानाचे .....  
तुझ्यासमोरी यशोमार्ग हा  
शिल्पकार तू तुझ्या यशाचा,  
जिद्दीला तव सलाम आहे  
लहान थोरांचा.....!

पालकांनी आपल्या पाल्याला मराठी शाळेत प्रवेश घेताना असुरक्षितता वाटू नये, कारण मूल महान घडवण्याची संधी मातृभाषेतच अधिक असते. मराठीच्या बळावर वेदांतने ब्रेन डेव्हलपमेंट, मंथन आणि शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये राज्यात अव्वल स्थान मिळवले, हेच त्याचे उदाहरण बोलके ठरते. त्यामुळे पालकांनी आपल्या पाल्याला मराठी शाळेत घालण्याचा अभिमान बाळगावा व वेदांतसारख्या विद्यार्थ्यांची उदाहरणे द्यावी, जेणेकरून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल व मराठी शाळांचा दर्जा वाढेल. अशी प्रगती जेंव्हा आपण मराठी माध्यमातील शाळातील विद्यार्थ्यांची वाचतो, ऐकतो तेंव्हा या शाळांचे योगदान तसेच मातृभाषेतून शिकण्यातील महत्व अधोरेखित होत मन प्रफुल्लित होऊन आनंदझरा निर्माण होतो.आमची सर्वच पिढी मराठी माध्यमाच्या शाळेतूनच शिक्षण घेत दैदीप्यमान यश मिळवीत आहे. कुसुमाग्रज यांनी म्हंटले आहे

भाषा मरता देशहि मरतो  
संस्कृतिचाही दिवा विझे  
गुलाम भाषिक होउनि अपुल्या  
प्रगतीचे शिर कापु नका

# ट्रम्प पुतीन संघर्षाची ठिणगी आणि महायुद्धाची भयघंटा

ज्योतिर्मय साहित्य

**जगात तिसरे महायुद्ध होण्यापासून रोखू, आपण तिसऱ्या महायुद्धाच्या अगदी जवळ आलो आहोत असा दावा ट्रम्प यानी विजयानंतरच्या पहिल्या भाषणात केला होता पण सत्तेवर येऊन सहा महिने झाले तरी युद्ध काही थांबत नाही, आता**

**डोनाल्ड ट्रम्प टॅरिफ धोरणाचे एकाहून एक धक्के रोज देत आहेत पण त्यांना रशिया युक्रेन युद्ध आणि इस्रायल हमास युद्ध थांबवता आले नाही ही शोकांतिका आहे. हट्टी ट्रम्प आणि हेकट पुतीन जगाला तिसऱ्या महायुद्धाकडे नेत आहेत काय? आता भारतच शांतिदूताची भूमिका पार पाडू शकतो.**






**प्रस्तावना**

सबंध जगाला युद्धाच्या खाईत लोटणारे राजकारण सध्या जगापुढे डोकेदुखी ठरत आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच या संकटातून जगाला वाचवू शकतात. शांतीदूत म्हणून भारताने अमेरिका आणि रशिया यांच्यातील तणाव कमी करण्यासाठी योग्य भूमिका घेऊन संवादाचे नवे पर्व सुरू केले पाहिजे कारण डोनाल्ड ट्रम्प यांची अरेरावी आणि त्यांच्या एकानंतर एक धमक्यामुळे रशियन नेते ब्लादेमोर पुतीन हे कमालीचे वैतागले आहेत आणि त्या पोटी त्यांनी युक्रेनवर जोरदार ड्रोन हल्ले सुरू केले आहेत ट्रम्प यांच्या धमकीनंतर पुतीन नरमतील असे वाटले होते पण तसे घडले नाही पुतीन यांनी तेवढ्याच जास्त प्रतिक्रियात्मक स्वरूपात युक्रेनवर हल्ला केला आणि पूर्वेकडील युक्रेनचा बळकावलेला ३० टक्के भाग सोडून देण्यास ते मुळीच तयार नाहीत तिकडे नाटो राष्ट्रांनी युक्रेनच्या बाजूने उभे राहून मागील गणिताची समीकरणे जशीच्या तशी पुढे मांडली आहेत आता या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर सारे जग चिंताग्रस्त झाले आहे.

प्रेसिडेंट ट्रम्प यांना सत्तेच्या बोहल्यावर चढून सहा महिने झाले परंतु २४ तासात युद्ध थांबविण्याचे आश्वासन हवेत विरले आहे.

गाझामध्ये आत्तापर्यंत ५८ हजाराहून अधिक लोक प्राणांस मुकले आहेत. रशिया युक्रेन युद्धात मृताचा आकडा लाखाच्या पलीकडे गेला आहे, हे कसे थांबणार?

ट्रम्प यांच्या धमक्या

डोनाल्ड ट्रम्प यांनी मागील आठवड्यात एका नंतर एक धमक्या देऊन पुतीन यांनी स्वतःला आवरावे युद्ध थांबवावे असा आग्रह केला आहे, युक्रेन मधील हास्यास्पद युद्ध थांबवा नाहीतर मोठ्या संकटाना म्हणजे निर्बंधांना तयार राहा असा त्यांच्या इशाऱ्यांचा गर्भित अर्थ होता.

डोनाल्ड ट्रम्प एकाच वेळी दोन आघाड्यावर लढत आहेत, पहिली म्हणजे त्यांची आघाडी आहे शस्त्र काढून त्याने ते जगातील सर्व राष्ट्रावर चालविले आहे अगदी त्यांचा मित्र असलेला भारत देश असो की युरोपियन युनियनचे सदस्य देश असो की शेजारचा कॅनडा असो कोणालाही ते पॅरिसच्या शस्त्रापासून सोडायला तयार नाहीत. मिळेल तेथे जेवढे जमेल तेवढे पॅरिसच्या रूपाने पदरात नफ्याची गुळाची ढेप टाकावयाची एवढेच ट्रम्प यांचे धोरण आहे. भर अब्दुल्ला गुड थैली मे, या म्हणी प्रमाणे ट्रम्प पॅरिसचा मुनाफा अमेरिकेच्या खात्यात जमा करण्यात दंग झाले आहेत, त्यांना जगात काय होईल जगाची आर्थिक घडी बिघडेल काय, खुद्द अमेरिकेचे अर्थकारण उध्वस्त झाले तर काय होईल याची मुळीच चिंता नाही. त्यामुळे ते एका नंतर एक धुमधडाका निर्णय घेऊन जगावर आपली हुकूमत प्रस्थापित करण्यात दंग आहेत. त्यांना असे वाटते की आपण जे करत आहोत ते सारेच बरोबर आहे पण त्यांची समीकरणे चुकत आहेत हे त्यांना कोण सांगणार आपण राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर हमास इजरायल आणि रशिया युक्रेन युद्ध ताबडतोब थांबवू अशी अभिवचने देणारे डोनाल्ड ट्रम्प आता थंड पडले आहेत, जो गरजतो तो बरसत नाही असे म्हणतात, ते खरे आहे राजकारणामध्ये खाण्याचे आणि दाखविण्याचे दात भिन्न असतात हे त्यांच्या राजकारणाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. **(क्रमशः)**






## जात्यावरच्या ओव्या......

---


वाटच्या वाटसरा
काय पाहतो खेड्याला?
सोन्याचं कुलूप
माह्या दादाच्या वाड्याला ||१७९||

चौवघ्या बहिणी
हाए एका चालनीच्या
पुसती आया बाया
लेकी कोण्या मालनीच्या? ||१८०||

---

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## रेषा नात्यांचा आरसा




ज्योतिर्मय साहित्य

रेषांचा विचार करताना आणखी एक छान विचार मनात येतो. एखाद्याचा उत्कर्ष, प्रगती आपल्याला सहन होत नाही. त्याची रेषा आपल्यापेक्षा मोठी होते आहे हे आपल्याला सहन होत नाही. मग अशावेळी आपण काय करतो ? तर त्याची रेषा लहान करण्याचा प्रयत्न करतो. पण असे न करता आपली रेषा मोठी करता आली तर.. ? दुसऱ्याची रेषा पुसून आपण मोठे होत नाही. स्वतःची रेषा वाढवली, की खरी उंची मिळते. स्वतःची रेषा एवढी उंच असावी की दुसऱ्याची रेषा मोजावीच लागू नये !

रेषा म्हणजे अंतर नाही, ती असावी एक विश्वासरेषा. रेषा फक्त विभाजनाची नसते ती जोडणीही असते. दोन पिढ्यांमधील रेषा, भिन्न स्वभावांमधील रेषा, भूतकाळ आणि वर्तमान यामधील रेषा. या सर्व रेषा जर विश्वासाच्या, समजुतीच्या आणि प्रेमाच्या असतील, तर त्या नात्यांचा आरसा अजूनच झळाळून उठतो.



रेषा म्हणजे नात्यांचा आरसा असतो. त्या आरशात आपण किती स्पष्ट, निर्मळ आणि प्रेमळ दिसतो, हे आपल्या वर्तनाच्या रेषांवर अवलंबून आहे. वाद असतीलच, पण ते पाण्यावरच्या रेषेसारखे निघून गेले पाहिजेत.

मर्यादा हव्यातच, पण त्या लक्ष्मणरेषेसारख्या संरक्षणार्थ आणि सन्मानार्थ हव्यात.


कारण शेवटी...

रेषा फक्त आखायच्या नसतात,

त्या ओलांडूनही पाहाव्यात

शांततेसाठी, प्रेमासाठी, माणुसकीसाठी.

एखाद्या सुंदर चित्रातील रेखीव रेषा चित्र आकर्षक बनवतात आणि वेड्यावाकड्या रेषा चित्र बिघडवतात. आपल्या रेषांनी सुंदर चित्र तयार व्हावे. प्रेमाचे, माणुसकीचे, आपुलकीचे रंग त्यात भरावे.



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## गुरूलक्षण

ज्योतिर्मय साहित्य

साधकाच्या मनात असा विचार येतो की,"पूर्वी मोठे ज्ञाते,विरक्त भक्त होऊन गेले. त्यांची योग्यता भगवंताच्या बरोबरीने होती. सिध्दि वश झाल्याने त्यांच्या अंगी अद्भुत सामर्थ्य होते. त्यांच्या अंगी असे विलक्षण सामर्थ्य होते ते आपल्याशीं नाही, म्हणून आपले हे ज्ञान व्यर्थ आहे. अशा प्रकारचा सामर्थ्य प्राप्ती चा स्वार्थी विचार साधकाच्या मनात येतो. हा विचार आत्मज्ञानाला मारक असतो कारण त्याने देहबुद्धी चे पोषण होते. ज्ञानाची निष्ठा कमी होऊन दुराशाच बळावते. त्यांच्या सांगण्याने लोकांच्या मनात परमार्थाबद्दल खोट्या कल्पनाच प्रचार पावतात.

म्हणून समर्थ त्यांना "वोखटे" असे निंदायुक्त विशेषण लावतात.

"निश्चयी संतपद"


फार फार आत्मसंयमाने हे पद प्रात होते.

कोणत्या तरी वासनेनें वेडी झालेलीं अनेक शब्दज्ञानी माणसं परमार्थ न साधता फुकट मेली. आपली ईच्छा पूर्ण व्हावी म्हणून धडपडणारे ते आयुष्य भर धडपडले व एक दिवस हे जग सोडून गेले. ज्याला कशाचीही वासना नाही असा संत विरळाच असतो. सर्व लोकाहून त्याचे मत निराळेच असते. तो नेहमीच अक्षय भगवंताबद्दलच बोलतो. संतांची ही एक मोठी खुण आहे. त्याला केव्हाही पहा,कोठेही पहा, कशाही परिस्थितीत पहा ,कोणत्याही अवस्थेत पहा,एका भगवंता वांचून शाश्वत ईश्वरावाचून तो इतर काही बोलणार नाही,सांगणार नाही, मनात आणणार नाही. मला अमुक हवे असे त्याच्या तोंडून कधीही निघणार नाही.

अशाच लोकांना संतपद प्राप्त होते.

***

## सर्वस्वी राहावे रामास अर्पण ।



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

आता ऐका माझे वचन । मनाने व्हावे रामार्पण ।। माझे नातेगोते एक राम । हा भाव ठेवून जावे रामास शरण ।। अनन्य व्हावे भगवंती । जो कृपेची साक्षात् मूर्ति ।। रामा आता करणे नाही उरले जाण । तुला आलो मी अनन्य शरण ।। सुखदुःखाचा दाता । सत्य नाही दुजा आता ।। जाणिवेने जैसे घ्यावे । तैसे मनाने सुखदुःख भोगावे ।। मी-माझेपणाची जोपर्यंत धडपड जाण । तोपर्यंत नाही समाधान ।। सर्वस्वी राहावे रामास अर्पण । हाच उपाय सांगती साधुजन ।। रामाला अर्पण व्हावे कोण्या रीती । त्याचा मार्ग सज्जन सांगती ।। प्रयत्नेविण राहो नये । फळाची आशा ठेवू नये । भगवंताला विसरू नये । कर्तव्य या दृष्टीने कर्म करावे ।। प्रथम राखावे भगवंताचे अधिष्ठान । तेथे व्हावा प्रयत्नाचा उगम ।। अखंड राखावे अनुसंधान । येणे कर्म होईल सहज रामार्पण ।।

वृत्ति राखावी अत्यंत शांत । हेच संताचे मुख्य लक्षण जाण ।। जे जे घडेल काही । ते ते रामइच्छेने पाही।। असा करावा संसार । परि असावे खबरदार । त्राता राम जाणुनी चित्ती । निर्भय करावी आपली वृत्ति। थोर भाग्य उदया आले । रामराय घरी आले । आता व्हावे रामाचे आपण। व्यवहार प्रपंच करावा जतन ।। न दुज्याचा दोष पाहावा । त्याचा आपणापाशीच ठेवा ।। देह आहे परतंत्र । मन राखावे भगवंताशी स्वतंत्र ।। मनाने जो बांधला । परतंत्र वाटेल त्याला ।। शरण गेला रामचरणी । त्याला नाही दुजी हानि ।। अखंड करावे नामस्मरण । नीतिधर्माचे असावे आचरण ।। बायकोमुले, लहान थोर । यांनी न सोडावा रघुवीर ।। काळ फार कठीण आला । बुद्धिभेद त्वरित झाला ।। आता सांभाळावे सर्वांनी आपण । रामाविण न जाऊ द्यावा क्षण । चालले तसेच चालावे। राम ठेवील तसे असावे ।। माझा राम जोडला हे जाणले ज्याने । त्याला न उरले करणे।। राम ठेवील ज्या स्थितीत । त्यात समाधान मानावे ।। रामास जे करणे असेल । ते तो करील ।। सदा सर्वकाळ माझ्याशी वास । हाच धरावा हव्यास ।। त्याला न जावे लागे कोठे । घरबसल्या राम भेटे ।। जो करी रामपदांबुजचिंतन । तयास नाही यमाचे बंधन ।। संताची सेवा केली । महद्भाग्य घरी आले।। एका परमात्म्याशिवाय नाही कोणास शरण ।। तोच खरा धन्य धन्य ।। संताचे मर्जीने वागल्यास। कल्याण होईल खास ।।

अखंड राखावे अनुसंधान । येणे कर्म होईल सहज रामार्पण ।।




## लिव्हरचं रुसणं

ज्योतिर्मय साहित्य

आपण सगळेच कुठे ना कुठे त्रास अनुभवत असतो कुणाला थकवा जाणवतो, कुणाचं पचन नीट होत नाही, कुणाला भूक लागत नाही तर कुणी सतत चिडचिड करत असतो. पण हे सगळं होतंय नेमकं का?

तुमचं शरीर तुमच्याशी बोलतंय पण आपण त्याचं ऐकत नाही!

थोडं लक्ष देऊन पाहा

तुम्हाला हे त्रास जाणवतात का?

सकाळी उठतानाच अंग थकल्यासारखं वाटतं

चेहरा काहीसा फिकट दिसतो

डोकं नेहमी जड-जड वाटतं

खाल्ल्यावर पोट सुजल्यासारखं होतं


थोडंसं खाल्लं कीही पोट भरल्यासारखं वाटतं

एकूणच उत्साह कमी झालाय, जर या पैकी २-३ लक्षणं तुमच्यात असतील तर हे लिव्हरचं रुसणं असू शकतं!

लिव्हर रुसतं म्हणजे काय?

लिव्हर म्हणजे आपल्या शरीराचा फिल्टर शरीरातले टॉक्सिन्स, केमिकल्स, हॉर्मोन्स, औषधांचे अंश यांचं शुद्धीकरण हे लिव्हरचं मुख्य काम.

आपण जास्त जेवण, जंक फूड, दारू, साखर, रात्रभर जागरण किंवा तणाव यामुळे लिव्हरवर भार टाकतो. आणि हळूहळू



लिव्हर थकायला लागतं.

थकलेलं लिव्हर हे एकदम गप्प बसत नाही

ते लक्षणांच्या रूपाने तुम्हाला "सांगतं" की

"माझ्याकडे लक्ष दे!"

मग उपाय काय?

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

सकाळी कोमट पाण्यात लिंबू आणि थोडं मध घेणं लिव्हर डिटॉक्ससाठी उत्तम.

आवडत असलं तरी पिझ्झा, बर्गर, फ्राईड पदार्थ कमी करा लिव्हरला थोडा आराम मिळू दे.

संध्याकाळी उशिरा खाणं टाळा लिव्हर रात्री रिपेअर मोडमध्ये जातं.

दररोज २० मिनिटं चालणं किंवा योगासनं करा रक्तप्रवाह वाढतो आणि लिव्हरला मदत होते.

दिवसातून ८-१० ग्लास पाणी प्या टॉक्सिन्स बाहेर जाणं सोपं होतं.

तुमचं लिव्हर तुमच्यावर रुसलेलं असेल पण थोडं प्रेम, थोडी काळजी आणि थोडं लक्ष दिलंत, की ते लगेच खुश होतं!

लक्षात ठेवा आरोग्य म्हणजे केवळ औषध नव्हे, तर शरीराशी मैत्री करण्याची एक सुंदर प्रक्रिया आहे.

## ।। संत महात्म्य ।।

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

### संत ज्ञानेश्वर महाराज यांचा अभंग

ज्योतिर्मय साहित्य

ही अशी अज्ञानात असणारी व रोज प्रसवूनही रोज वांझ ठरणारी गाय कोणती हे तुम्ही सद्गुरूंना विचारा. कारण त्यांच्या चैतन्य मयी स्पर्शा शिवाय मन ब्रह्म स्थानात लीन होणार नाही. म्हणजेच मनाची उत्तम अवस्था प्राप्त होणार नाही. असे संकेत मनासाठी ज्ञानेश्वर माऊलींनी इथे दिले आहेत.

मनाच्या चंचल ते विषयी तुकाराम महाराज म्हणतात

मन माझे चपळ न राहे निश्चळ
घडी एकी पळ स्थिर नाही
आता तू उदास नव्हे नारायणा
धावे मजदिना गांजियले
धाव घाली पुढे इंद्रियाचे ओढी
केले तडातडी चीत माझे

विषयाकडे वळलेले मन आपणास कसे गांजून टाकते हे आपणास यातून कळते.

मनाविषयी निळोबा राय काय म्हणतात ते आता आपण पाहू

मन विश्रांती पावले
गुरु चरणी स्थिरावले
ज्ञानयुक्त होता मन
ब्रह्मभूत झाले जान
जिकडे जिकडे जाय मन
तिकडे तिकडे अधिष्ठान
निळा म्हणे मन
होऊनी ठेले उन्मन

इथेही आपणास विषयाकडे वळलेले मन दुःख देणारे तर ब्रह्मरूप झालेले मन हे सुख देणारे, महानंद देणारे व उन्मनी अवस्थेत गेलेले दिसून येते.

तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात

नको नको मना गुंतू माया जाळी
काळ आला जवळी ग्रासावया
काळाचीए उडी पडेल बा जेव्हा
सोडविना तेव्हा मायबाप

विषयात अडकलेले मन हे माया जाळात अडकलेले आहे तिथे त्याला गुंतू देऊ नकोस तर ते ब्रह्मरूप कर आत्म्याकडे वळव कारण केव्हाही काळ ग्रासेल असेच तुकाराम महाराज सांगतात.

समर्थ रामदास स्वामी मनाविषयी काय म्हणतात तेही आपण पाहू

मना पाप संकल्प सोडून द्यावा
मना सत्य संकल्प जीवि धरावा
मना कल्पना ते नको विषयाची
विकारी घडे हो जनी सर्व ची ची

विषयात अडकलेले मन हे पाप संकल्प करणारे असते तर सत्य संकल्प हा केवळ आत्म्यात लीन होणारे मनच करू शकते. ते करावे. मनात विषयांची कल्पना करू नये. कारण त्यामुळे विकार ग्रस्त मन होते. असेच रामदास स्वामी हे सांगतात.

संत कबीर म्हणतात कबीरा मन निर्मल करे जैसे गंगाका नीर पाछे पाछे हरी फिरे कहत कबीर कबीर मनातील विकारांचा मळ काढून मन हे गंगेच्या पाण्या सारखे निर्मळ करायला हवे. त्यासाठीची साधना करायला हवी. असे केले तर तुम्हाला परमेश्वराच्या पाठीमागे लागण्याची गरज नाही, तर उलट तोच तुमच्या पाठीमागे लागेल. असे कबीर म्हणतात.

आपले मन स्वाभाविकपणे विषयाकडे वळलेले असते. यात सतत नवनवीन कल्पना चे उन्मेश भरून येतात. इच्छा आकांक्षा जन्म घेतात व म्हणूनच असे मन हे अल्पजीवी सुख व दीर्घकाळ दुःख देणारेच ठरते या अल्पजीवी सुखाकडून शाश्वत सुखाकडे जायचे असेल तर मनाचा फेर उलट करून आत्म्याकडे वळवावा लागेल. आणि यासाठी सद्गुरुला शरण जाऊन त्यांच्या सानिध्यात कठोर साधना ही करावी लागेल. अशी साधना आपण करावी असेच संकेत ज्ञानेश्वर माऊली या अभंगातून आपणास देत आहेत.

जीवनाचे ध्येयच मुळी दुःखाची निवृत्ती व सुखाचा शाश्वत लाभ हेच आहे दुःखाचा त्याग होऊन सुखाचा लाभ कसा मिळावा याचा मूलमंत्र देणाऱ्या महान मानसोपचार तज्ञ संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या चरणावर विनम्र भावाने प्रणिपात करून हा भाग इथे संपवूया

निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई एकनाथ नामदेव तुकाराम

जय हरी माऊली

## ।। निरूपण ।।



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

१. मंगलाचरण

गजानना लंबोदरा। श्रीगणेशा विनायका।।

आद्यनमन करितो। आज या कथाप्रसंगा।।

नमन माये स्वीकारी। रेणुके दासासी तारी।।

कथेत रंगत भारी। भावभक्तीची उभारी।।

शारदाहंससहिता। ऐंबीजधारिणी माता।।

तुचि विद्येची देवता। प्रणाम स्वीकारी आता।।

पितामह गुरुनाथा। भगवानशास्त्रीसन्ता।।

लोटांगणी मी आजोबा। मुखे बोलवावी कथा।।

वेदान्तज्ञानस्वरूपा। श्रीगुरूजीरंगनाथा।।

पायी आलो हो तुमच्या। गोड करा माझी कथा।।

***

## ।। श्री राम कथा ।।



वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

कांहीं दिवस आनंदात गेले. तिथे शुर्पनखा आली. रामा बद्दल तिच्या मनात मोह निर्माण झाला.ती म्हणे मला तुझ्याशी लग्न करायची इच्छा आहे.राम म्हणाले हे शक्य नाही. पण माझा भाऊ अविवाहित आहे.उद्या ये. दुसरे दिवशी शुर्पणखा लक्ष्मनाकडे आली.लक्ष्मण म्हणे मी तुझ्याशी लग्न करतो पण तुला रामाची, सीतेची व माझी सेवा करावी लागेल. तिला ते मान्य नव्हते.लक्ष्मण म्हणे अहो तुम्ही रामाशी लग्न करा.माझे वडिलांनी तीन लग्न केले होते. ती म्हणाली मला तर रामच जास्त आवडले आहेत. मी कुमारिका आहे असे तिने रामास खोटेच सांगितले होते. खरे तर ती विधवा होती.तिच्या पतीस रावणानेच मारले होते.ही लंकेत रोजच कटकट करीत असे हणून कंटाळून रावणाने खरं, दुषन या आपल्या भावा सहीत हिला दंडकारण्यात ठेवले होते.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

लक्ष्मण तिला म्हणाला तू उद्या रामाकडे जा व लग्न करण्याचा आग्रह कर. रामानी,लक्ष्मणाकडे व लक्ष्मणाने रामाकडे अशी तिची टोलवा टोलवी चालली. शेवटी लक्ष्मणाने तिला विद्रूप केले.

रामानी लक्ष्मण हा कुमार म्हणजे अविवाहित आहे हे खोटे शुर्पणखेस खोटेच का सांगितले?

शुर्पणखाने रामास मी कुमारिका आहे हे आधी खोटे सांगितले होते. म्हणून रामचंद्र प्रभूस असत्याचा दोष लागत नाही. शुर्पणखा कशी राहते हे पाहण्या साठी अकंपन नावाचा हेर रावणाने तिचे सोबत ठेवला होता.खर, दूषण हेही तिचे भाऊ होते. (क्रमशः)

## फुलमाला....



गुलबहार (डेझी फ्लॉवर)

गुलबहार फुले पहिल्या किरणांबरोबर उमलतात,
या फुलांना निरागसता आणि शुद्धतेचे प्रतीक मानतात.

पांढऱ्या व गुलाबी रंगांमध्ये हे फूल दिसते खूप मनभावन,
याच्या रूपाला आकर्षित होऊन मधमाशा,
फुलपाखरे करती गुंजन..

हे फूल रस्त्याच्या कडेला नैसर्गिकरित्या सहज उगवते.
शुभेच्छा देण्यासाठी आणि
आयुर्वेदिक औषधासाठी उपयोगी पडते..

सौ. माधुरी म.इनामदार, मिरज

# आओ गांव चलें उपक्रम : ग्रामीण आरोग्य सेवेसाठी महत्त्वपूर्ण पाऊल - डॉ. अनुपम टाकळकर



**छत्रपती संभाजीनगर** - इंडियन मेडिकल असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर शाखेतर्फे ''आओ गांव चलें'' या उपक्रमांतर्गत रविवार, दिनांक २० जुलै २०२५ रोजी आडगांव बुद्रुक येथे भव्य मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले.

आयएमए ने केवळ एका दिवसात आरोग्य तपासणी न करता, शिबिराआधी दोन दिवसांपासूनच नियोजन सुरू करून रुग्णसेवेची प्रभावी आखणी केली. शिबिराआधी दोन दिवसांपूर्वी गावातील १०० रुग्णांचे रक्तनमुने तपासण्यात आले. शिबिराच्या एक दिवस आधी आयएमएच्या डॉक्टर्स टीमने गावात भेट देऊन आरोग्य जनजागृती केली, तसेच शिबिरात भाग घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेतील विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाने केली. प्रमुख पाहुणे म्हणून मा. आमदार अनुराधा चव्हाण यांची उपस्थिती लाभली. तसेच अध्यक्ष डॉ अनुपम टाकळकर यांनी मार्गदर्शन केले. शिबिरात ४५७ हून अधिक रुग्णांची तपासणी विविध तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत करण्यात आली. वैद्यकीय तपासणी व सेवा: फिजिशियन विभाग- ११२ रुग्ण, अस्थिरोग विभाग ८९ रुग्ण, त्वचारोग विभाग -६७ रुग्ण, शस्त्रक्रिया विभाग -३० रुग्ण, स्त्रीरोग विभाग-३० रुग्ण, नेत्रतपासणी विभाग- तपासणी करून चष्मे वितरित केले - ६० रुग्ण, कान नाक घसा - २६रुग्ण, बालरोग- ४३रुग्ण, १०० रक्तनमुने तपासण्यात आले, यामध्ये १८ मधुमेही रुग्ण आढळले, हे मधुमेहाचे लक्षणीय प्रमाण दर्शवते. एक गंभीर ॲनिमिक रुग्ण आढळून आल्यामुळे त्याला तातडीने रुग्णालयात दाखल होण्यासाठी शिफारस करण्यात आली. २ दिवसांपूर्वी रक्तनमुने घेण्यात आले व काल डॉक्टरांची टीम गावात जाऊन जनजागृती केली. ऑटोरिफ्रॅक्टोमीटरद्वारे नेत्रतपासणी करून ६० रुग्ण तपासले, त्यापैकी ८०% रुग्णांना चष्म्यांची गरज असल्याचे निदान झाले व चष्मे दिले. रू. २०,०००/- किमतीची मोफत औषध वाटप करण्यात आले. या उपक्रमाचे समन्वयन आयएमए चे कोषाध्यक्ष डॉ. शिवाजी पोले यांनी प्रभावीपणे पार पाडले. आडगांव हे गांव या नवीन कार्यकारिणीने या वर्षात दत्तक घेतलेले तिसरे गांव आहे. या वर्षी टीमने प्रथम दिन्नापूर, नंतर मुरमा, आणि आता आडगांव बुद्रुक ही तीन गावे आरोग्यदृष्ट्या दत्तक घेतली आहे. याशिवाय, नावाचा एक अभिनव उपक्रमही सुरू करण्यात आला आहे. या अंतर्गत, जे रुग्ण स्वतःहून डॉक्टरांकडे जाऊ शकत नाहीत, जसे की वृद्धाश्रमातील जेष्ठ नागरिक, अंध व्यक्ती, अनाथाश्रमातील मुले, ऑटीझम ग्रस्त मुले यांच्यापर्यंत डॉक्टर पोहोचतात आणि त्यांची नियमित वैद्यकीय तपासणी केली जाते. या शिबिरात डॉ. अनुपम टाकळकर - त्वचारोग, डॉ. योगेश लक्कस - फिजिशियन, डॉ. शिवाजी पोले - रेडिओलॉजिस्ट, डॉ. आसावरी टाकळकर त्वचारोग डॉ. संभाजी चिंताळे - ईएनटी, डॉ. इशरत बारुदवाला - स्त्रीरोग, डॉ. अंजली गाडे - रेडिओलॉजिस्ट, डॉ. संजय खंडागळे - सर्जन, डॉ. अब्दुल माजिद - न्युरोलॉजिस्ट, डॉ. अनिल धुळे - अस्थिरोग, डॉ. कुंदा धुळे, डॉ. शहाजी तौर बालरोग डॉ. निशा तौर - स्त्रीरोग, डॉ. सोहेल, डॉ. जुनेद, डॉ. ओमर यांनी भाग घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ शिवाजी पोले यांनी केले. प्रसिद्ध मेंदू विकार तज्ञ अपेक्स हॉस्पिटलचे डॉ. अब्दुल माजिद यांनी याप्रसंगी मराठी कविता सादर करून उपस्थित्यांची मने जिंकली : ''क्या लेके आये थे, क्या लेके जाना है'' आयुष्यात संपत्ती नसून चांगले कर्म आणि माणुसकीचं वागणं याला खरी किंमत आहे. ते म्हणाले, ''आई-वडील हेच खरे देव आहेत. त्यांची सेवा म्हणजेच खरी भक्ती आहे.''

अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर यावेळी म्हणाले ''आओ गांव चलें'' उपक्रम हे आमचे सामाजिक उत्तरदायित्व आहे. आम्ही केवळ उपचार करत नाही, तर गावात आरोग्य संस्कृती पोहोचवत आहोत. आजच्या सहभागातून हे स्पष्ट होते की ग्रामस्थांची गरज आम्ही ओळखली आणि तिची पूर्तता केली.''

सचिव डॉ. योगेश लक्कस म्हणाले ''संपूर्ण टीमचे मनापासून अभिनंदन करतो. या उपक्रमात रक्ततपासणी, मधुमेह तपासणी, नेत्रतपासणी, आणि जनजागृती हे सगळं नियोजनबद्ध रितीने पार पडलं.''

आपल्या मार्गदर्शनात आमदार अनुराधा ताई चव्हाण म्हणाल्या '' चं कार्य अत्यंत प्रेरणादायक आहे. गावात अशा प्रकारची तज्ज्ञ तपासणी मोफत होणं ही सामान्य जनतेसाठी खूप मोठी गोष्ट आहे. या उपक्रमामुळे 'डॉक्टर' या शब्दातली विश्वासार्हता अधोरेखित झाली आहे.''

डॉ. शिवाजी पोले यांनी आपले विचार व्यक्त केले- ''गावाच्या प्रत्येक घरापर्यंत आरोग्य पोहोचवणं हेच आमचं ध्येय आहे. 'आओ गांव चलें' उपक्रमामध्ये प्रत्येक डॉक्टरने समाजकार्याची जाण ठेवून काम केलं.

गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद हा आमच्या मेहनतीचं फळ आहे.'' हा उपक्रम डॉक्टरांच्या सेवाभावी वृत्तीचा उत्कृष्ट नमुना ठरला. च्या 'आओ गांव चलें' उपक्रमामुळे आरोग्याची नवी जाणीव गावात निर्माण झाली आहे.



## इंदापूरी निखारे



### अद्वितीय वृक्ष....

ज्योतिर्मय साहित्य

हा अतिशय पवित्र वृक्ष...
पूर्ण भारतातच नव्हे तर जगात...
अगदी विरळ जातकुळीचा...
याचे नुसते दर्शन घ्या...

तुम्ही कोणत्याही परिस्थितीत...
प्रचंड आनंदीच राहणार...
अतिशय शक्तिमान...
याच्या समोर दुसरा कोणताही वृक्ष...
वाढूच शकत नाही...
वाढू देत पण नाही...

त्याची ताकद त्यांना माहीत आहे...
अगदी आत्तापर्यंत...
जगात कोणालाही माहीत नसणारी कथा आपल्यासमोर ...
अतिशय विनम्रपणे बरं...

कोणालाही माहित नाही...
अगदी संपूर्ण जगात...
जेव्हा पृथ्वीचा उदय करण्याचे ठरले...
लाखो वर्षांपूर्वी...
त्यामध्ये या वृक्षाचे खूप मोलाचे योगदान आहे...

सगळे जगातील सगळ्या जाती धर्माचे देव...
यांच्याबरोबर गहन चर्चा करत असतात...

आणि हा असा...
प्रचंड वृक्ष...
आणि एकमेव...
भारत देशात आहे ...
हेच मुळी किती भाग्याचे...
पण लोकं...

सगळे फालतू...
त्या वृक्षाला किरकोळ प्रश्नात ...
अडकवून ठेण्याचा प्रयत्न...
अर्थात तो अद्वितीय वृक्ष आणि तोही एकमेव...
दुर्लक्ष करतो...
हे त्या लोकांना कळत नाही...

लोकं पण ना...
अन्न, वस्त्र, निवारा...
आता हे काय प्रश्न...
अति किरकोळ...
त्या महान वृक्षाला विचारावे का?

अजून तो एक प्रश्न...
बिडी, काडी, इडीचा...
इतका सोपा उपाय आहे...
पण तरी सुद्धा कटकट...
ते अजून जुनाट वृक्षांनाच...
कवटाळून बसलेले...


जगातले सगळे वृक्ष...
या वृक्षा समोर खुजे आहेत...
हे फक्त दोन चार लोकांना समजले...
आपण पण समजून घेण्याचा प्रयत्न करु या ...


बाकी जगातल्या अनेक मोठ मोठ्या वृक्षांना...
उध्वस्त करून टाकू या ...
आणि हे फक्त...
आपल्याच देशाचा
संपूर्ण विकास करण्यासाठी...
उध्वस्त करून यशस्वी होता येते...
हे समजत नाही, ऐकून पण घेत नाही...

म्हणून सामान्यांनी फक्त या वृक्षाला नमन करून...
वंदन करून झोपत जावे...
तो वृक्षच सगळी काळजी घेईल...
अत्याचारात सुद्धा...
तुम्हाला आनंदाच्या उकळ्या फुटतील...
आणि हो, तो तुम्हाला अत्याचार वाटेल...

तर तसे नाही ...
हे तुमच्या विकासाकडे ...
तुमच्या उज्वल भवितव्यासाठी...
पाहिले पाऊल असेल...

यात तिळमात्र शंका नाही आणि असेल तर...





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

### शांतिनिकेतन ते विश्वभारती

थोरांची चरित्रे, राष्ट्रप्रेम, सदाचार यासारख्या लहान मुलांच्या वयाला न पेलणाऱ्या गोष्टी त्यांनी आपल्या पाठ्यपुस्तकात ठेवल्याच नाहीत. या गोष्टींना त्यांचा विरोध होता अशातला भाग नव्हता परंतु मुलांना सहजपणे कसे शिकता येईल त्यांचे शिक्षण आनंददायी कसे होईल यावर त्यांचा भर होता. त्यांनी मुलांचे बालसृष्टीतील मित्र होऊन, त्यांच्या पातळीवर जाऊन या पाठ्यपुस्तकांची निर्मिती केली. या पाठ्यपुस्तकातील एक एक धडा म्हणजे सुंदर शब्दचित्रच आहे ! सभोवतालच्या जगाचे निरीक्षण करता करता मुले सहजपणे यातून शिकत जातात आणि आपण काही शिकतो आहोत याची जाणीव न होता सहज शिकत जातात हे या पाठ्यपुस्तकांचे वैशिष्ट्य आहे. यातील पाठ गाता येतात, पाहता येतात, ऐकता येतात आणि अनुभवता येतात.

शांतिनिकेतनमध्ये त्यावेळी प्रख्यात चित्रकार नंदलाल बोस विद्यार्थ्यांना चित्रकला शिकवत. त्यांच्या सुंदर चित्रांनी ही पुस्तके नटलेली आहेत. रवींद्रनाथांचे शब्द आणि नंदलाल बोस यांची बोलकी चित्रे यांचा सुरेख संगम या पाठ्यपुस्तकांमध्ये झाला आहे. पु ल देशपांडे यांनी शांतिनिकेतनमध्ये काही काळ वास्तव्य केले होते. या पुस्तकांबद्दल बोलताना ते म्हणतात, ''माझ्या शांतीनिकेतन मधल्या वास्तव्यात या सहजपाठांनी माझे हरवलेले बालपण मला परत आणून दिले. ज्याला म्हणून बंगाली शिकायचे असेल त्याने सहजपाठाचे हे चार भाग पुन्हा पुन्हा वाचावेत. बंगाली भाषेच्या अंगाखांद्यावर खेळल्यासारखे वाटेल. सहजपाठ म्हणजे गुरुदेवांचे बंगालवर असलेले महान उपकार ! ''

बंगालमधील खेड्यात राहणारी मुले मुली डोळ्यासमोर ठेवूनच रवींद्रनाथांनी हे सहजपाठ लिहिले. सकाळचे वर्णन ते किती सुंदर करतात ते पहा

आलो हॉय - गॅलॉ भोय, चारी दिक झिक मिक -
( उजेड होतो, भय जाते, चारी बाजूला झुंजूमुंजू होते )

हे सगळे मुले गात गात आनंदाने म्हणू शकतात. सकाळ झाल्यानंतर गावातील माणसे कशी कामाला लागली याचेही चित्र सोप्या शब्दातून ते मुलांसमोर उभं करतात

पाडे पेरू हरी हर
मधू राय बांधे घर
होडी हाके पातू पाल
धान्य आणे जयलाल
धरे सुकाणू दीनानाथ
अविनाश रांधे भात.

आपल्याकडे शाळेतील मुलांना कविता पाठ केल्या की परीक्षेला मार्क मिळतात एवढेच ठाऊक. परंतु त्यातून मिळणाऱ्या आनंदाला ही मुले पारखी होतात. कविता या चालीवर सुंदर गाता येतात, त्या म्हणताना नाचता येते त्या गात गात भाषा शिकता येते, याची जाणीवच आमच्याकडे करून दिली गेली नाही. बंगालमधील मुले खरोखरच भाग्यवान म्हणावी लागतील कारण रवींद्रनाथांनी त्यांना शेकडो सुंदर गाणी रचून दिली. त्या गीतांना सुंदर चाली लावल्या गेल्या. बंगाली माणसाचे बालपण या गीतांनीच समृद्ध झाले. **(क्रमशः)**

## आठवणीच्या रोजनिशीतील काही पाने..
### भाग..२ आजी..❤

आजी आणि नात म्हणजे जशी साय आणि साखर
त्यातील स्निग्धता, गोडवा हृदयात राहतोच निरंतर..

माझी आई कोल्हापुर मध्ये शिक्षिका होती त्यामुळे आम्ही तिकडेच होतो.. तात्या (माझे वडील) बोरगाव, आमचे मूळ गावात रहायचे... शनिवारी रविवारी कोल्हापूरला यायचे. पण आजी आजोबा थकले म्हणून आईला आपली नोकरी सोडून त्यांच्या सेवेसाठी बोरगावला यावे लागले. माझे पुण्यात एक काका होते. ते अधून मधून गावी येत असत. तिथे आले तेव्हा मी सहावीत गेले होते.. साधारण वर्षभरातच आजोबा गेले त्यामुळे त्यांच्या काही फारशा आठवणी नाहीत.

पण इकडची आजी (वडिलांची आई) खूप गोरी पान आणि सुंदर होती. आजोबा असताना रुपया एवढे मोठे कुंकू लावीत असे. ते गेल्यावर हळूहळू थकून तिचे पाय काम देईना झाले. आणि कानाला पूर्ण ऐकू येणे बंद झाले होते. तिला कानाचे मशीन आणले होते... पण तिला ते फारसे आवडत नसे, ती ते क्वचित वापरे... पण इत्यंभूत माहिती तिला कानात जोरात सांगावी लागे... आमचा मोठा वाडा होता. बाथरूम ही दूर आणि त्या जुन्या काळी फारशा सोयी नव्हत्याच. त्यामुळे इतर अन्हिके आणि अंघोळीला नेताना ती हळूहळू पोत्यावर सरकून बसे आणि दोन्ही बाजूला दोघे आम्ही तिला अलगद उचलून नेत असू.

तिला सगळे अगदी स्वच्छ आणि शिस्तीत लागे. तिने शेवटपर्यंत नऊवारीच नेसली. तिच्या मऊ चौघडी अंथरलेल्या अंथरुणावर तिला एकही सुरकुती चालत नसे. तिच्या डोक्यापाशी एक लाकडी पेटी होती त्या मध्ये खारकेची पूड, चिरमुरे असे काही पदार्थ ठेवलेले होते. तिला उपवासाला खारकेची खीर लागे.. आणि नंतर नंतर तर ती कढत दूध, तूप साखर आणि थोडी गरम भाकरी खाई. पण चुलीवरून सरळ तिच्या पानात वाढावी लागे.. कमी तरीही शेलके खाणे ही आवड बहुतेक तिच्याकडूनच माझ्यात उतरली आहे असे मला वाटते...

माझे आजोबा डॉक्टर होते. आजी तिसरी पास. पण तिला वाचनाची खूप आवड होती. त्यासाठी आजोबांनी तिला कल्याण मासिक लावले होते. ते हिंदीत होते. पण माझी आजी ते व्यवस्थित वाचत असे. महाभारत रामायण वरची त्यांच्यामधील चित्रे मला फार आवडत. आमची महाभारत रामायणाची पहिली ओळख आजीमुळेच झाली. रोज संध्याकाळी तिच्या शेजारी बसून आम्ही शुभंकरोती, इतर स्तोत्रे म्हणत असू. आमचा थोडा जरी उच्चार चुकला तर ती आमच्या ओठांच्या हालचालीवरून ओळखी आणि परत म्हणायला लावी. मग रोज रामायण आणि महाभारतातील एक गोष्ट सांगे. त्याची गोडी तिच्यामुळेच लागली. ती अतिशय बुद्धिमान होती. आई आतून जर मला ओरडली आणि माझ्या चेहऱ्यावरचे भाव बदलले तरी ती ओळखत असे. आणि विचारी काय पराक्रम केलास म्हणून?

माझ्या आईला लग्नानंतर खूप सासुरवास सहन करावा लागला. पण त्याची झळ त्या दोघींनी आम्हा पर्यंत कधीच येऊ दिली नाही. त्यामुळे आजी नातवंडाच्या नात्यातील गोडवा टिकून राहिला. आमच्या कडे कोणीही आले माझ्या मैत्रिणी आल्या तरी ती सगळ्यांची विचारपूस करून गप्पा मारत असे. अशी ही माझी प्रेमळ, बुद्धिमान आजी मी बारावी झाल्यावर एक दिवस शांत पणे आणि आनंदात झोपेत गेली...

आता मध्ये खूप काळ गेला.. तरीही आजीच्या आठवणी तशाच ताज्या राहिल्या आहेत.. माझ्या चेहऱ्यावरचे सहज भाव वाचणारी आजी आज असती तर म्हणाली असती. कृष्ण केवळ आवडण्यासाठी नसतो. त्याचा भाव उतरव तुझ्यापण जीवनात...😊🥰

सौ.माधुरी म. इनामदार, मिरज.


## ऑनलाईन औषधोपचार




आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

# स्वातंत्र्यचळवळीतील एक प्रेरणादायी अध्याय - भगवतीचरण वोहरा

**ज्योतिर्मय साहित्य**
**(मागील अंकावरून)**

१९२६ मध्ये भगवतीचरण वोहरा आणि भगतसिंग यांनी नौजवान भारत सभेची स्थापना केली. या संघानेचे प्रचार सचिव म्हणून भगवतीचरण यांची निवड करण्यात आली होती. या संघटनेचे घोषणापत्रही त्यांनीच तयार केले होते. १९२७ मध्ये भगवतीचरण यांनी लाहोर छात्र संघाच्या संघठनासाठी मोठी भूमिका बजावली होती. त्यानंतर भगतसिंह यांच्याबरोबर हिंदुस्थान समाजवादी प्रजातंत्र सेना या संघटनेच्या स्थापनेपासून म्हणजे ८, ९ सप्टेंबर १९२८ पासून त्यांनी काम करण्यास सुरवात केली. या संघटनेच्या घोषणापत्र तयार करण्यासाठीची जबाबदारी भगतसिंह यांच्याबरोबर त्यांनी पार पाडली. याच काळात त्यांनी पंजाबमधील युवकांसाठी छोटे निबंध, पुस्तके, संवादासाठी विविध माध्यमातून संबंध प्रस्थापित केले. यामधील मेसेज ऑफ इंडिया हा निबंध त्यांचा विशेष गाजला. १९२८ साली सायमन कमीशन भारतात आले. या कमीशनवर बहिष्काराची मोठी लाट भारतवर्षात उसळली. या कमीशनच्या गाडीवर हिंदुस्थान समाजवादी प्रजातंत्र सेनेने बाँब टाकावा आणि ती उडवून लावावी यासाठी बंगाल मधून यतींद्रनाथ दास यांना पाचारण करण्यात आले. पण पैशाच्या अनुपलब्धतेमुळे बॉम्ब तयार करणे शक्य झाले नाही. २० ऑक्टोबर १९२८ रोजी सायमन कमीशन हे धिक्काराच्या आरोळ्यांचे पसायदान घेत घेत पंजाब प्रांताची राजधानी लाहोर येथे धडकले. त्याविरुद्ध २० ऑक्टोंबर रोजी लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली प्रचंड मिरवणूक निघाली. यामध्ये हिसप्रसचे नेते मिरवणुकीत होतेच. या मिरवणुकीवर लाठीहल्ला झाला आणि लाला लजपतराय यांच्यावर लक्षपूर्वक हल्ला पोलीस सुपरिटेंडेंट स्कॉटने डी.एस.पी. सॅपडर्स यांच्यामाध्यमातून केला. सुखदेव, भगवतीचरण आणि यशपाल त्याठिकाणी उपस्थित होते. त्यांनी लाला लजपतराय यांना वाचविण्याचा प्रयत्न केला. या हल्ल्यानंतर जखमी अवस्थेतही मोर्चा विसर्जीत करून लाला लजपतराय यांनी सायंकाळी मोठी सभा घेतली आणि या हल्ल्यामुळे ब्रिटिश शासन भारतातून विलयाला जाईल असे भाकित केले. १७ नोव्हेंबर १९२८ रोजी या मारहाणीमुळे लालाजींचे निधन झाले. लाख-दीडलाख लोकांनी अंत्ययात्रा काढीत हिंदु, मुसलमान, शीख या समुदायाने शासनाचा निषेध करीत घृणा व्यक्त केली. रात्रभर




लालाजींच्या जळत्या चितेजवळ भगवतीचरण व यशपाल या क्रांतीकारकांनी पहारा दिला व इथेच लालाजींच्या आहुतीची बाब लक्षात ठेवून स्कॉट आणि सँडर्सच्या हत्येचा निश्चय करण्यात येऊन सूड उगविण्याचा निर्णय घेण्यात आला. १७ डिसेंबर १९२८ रोजी सॅण्डर्सची हत्या करण्यात आली. चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरू यांनी व इतरांनी मदत केलेल्या हत्येनंतर लाहोरमधून त्यांना दुसरीकडे जाणे गरजेचे होते. चंद्रशेखर आझाद यांनी मथुरेला जाणाऱ्या काही वृद्ध यात्रेकरूंचा एक जथ्था तयार केला व स्वतः त्याचे पुरोहित होऊन लाहोर सोडण्यात यश मिळविले. भगतसिंह हे शीख असल्याने ओळखू नये म्हणून त्यांनी केस इंग्रजी पध्दतीने कापून घेतले. पाश्चात्य वळणाचा साहेबाचा वेष भगतसिंह यांनी परिधान करून भगवतीचरण वोहरा यांची पत्नी दुर्गादेवी यांना त्यांची पत्नी असा देखावा करून तसेच दुगीदेवींचा तीन वर्षाचा मुलगा शचीन्द्रकुमार यालाही बरोबर घेऊन लखनौ स्टेशनवरून कलकत्त्याला प्रयाण केले. भगवतीचरण कलकत्त्यालाच अज्ञातवासात क्रांतीकारी सुशिलादेवी यांच्याकडे राहत होते. कलकत्त्यातून हिंसप्रसे चे काम भगतसिंह आणि भगवतीचरण यांनी चालू केले.सॅण्डर्स हत्येने या संघटनेचे वजन वाढले होते.

८ एप्रिल १९२९ रोजी जनमत ठोकरून आपल्या विशेषाधिकाराचा वापर करून दोन बीले गव्हर्नर मंजूर करणार होते. भगतसिंह आणि बटुकेश्वर दत्त यांनी असेंब्लीत बॉम्ब फेकून पळून जाण्याची संधी असूनही संघटनेचे महत्व भारतभर समजण्यासाठी स्वतःला अटक करून घेतली. या कामगिरीवर जात असताना दुर्गादेवी वोहरा यांनी आपला हात कट करून रक्ताचा टिळा भगतसिंह आणि बटुकेश्वर यांना विजयी होण्यासाठी लावला होता. भगवतीचरण वोहरा यांचाही या कटात सहभाग होता. २३ डिसेंबर १९२९ रोजी दिल्ली-आग्रा रेल्वे मार्गावर व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन यांची स्पेशल ट्रेन उडवण्याची कारवाई करण्यासाठी भगवतीचरण आणि यशपाल यांनी महिनाभर चांगली तयारी केली होती. त्यांना ट्रेनच्या खाली बॉम्बचा स्फोट करण्यात यश मिळाले होते. स्फोटामुळे ट्रेनचा खाना बनविणारा डबा उडाला पण व्हाइसरॉय थोडक्यात बचावले. यामुळे बॉम्ब




बनविण्यात भगवतीचरण आणि यशपाल यांनी यश मिळविल्याचेही सिद्ध झाले. त्यामुळे चंद्रशेखर आझाद यांच्यासह सर्वजण आनंदी झाले. जेलमध्ये असणाऱ्या भगतसिंह आणि इतरांना सोडविण्यासाठी बॉम्बचा उपयोग करण्याचे भगवतीचरण वोहरा यांचे ध्येय होते. अनेक क्रांतीकारकांना अटक झाल्यानंतरही भगवतीचरण अटक टाळण्यात यशस्वी झाले होते. भगतसिंग आणि इतर क्रांतीकारकांना तुरूंगातून पळून जाण्यासाठी ते एका धाडसी योजना आखण्यात सहभागी होते. त्यासाठी काही बॉम्बची चाचणी आवश्यक होती. यशपाल यांनी तयार केलेल्या बॉम्बची तपासणी कण्यासाठी त्यांची वाट न बघता केलेला मसाला बॉम्बच्या कव्हरमध्ये भरून भगवतीचरण हे सुखदेव राज उर्फ वैश्यपायन यांना घेऊन रावीच्या किनारी असलेल्या जंगलात टेस्ट करण्यासाठी गेले. सुखदेवराज यास लांब थांबवून बॉम्बची पीन काढून तो फेकण्यासाठी भगवतीचरण यांनी प्रयत्न करीत असतानाच बॉम्बचा स्फोट होऊन त्याठिकाणी जखमी अवस्थेत त्यांना वीरमरण आले. जखमी अवस्थेतही त्यांनी सुखदेवराज यास सांगितले,माझ्या मृत्यूनंतरही भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त यांना तुरुंगातून सोडवा. अटक झाली असती तर फाशीच मिळाली असती अशा वीर भगवतीचरण या स्वातंत्र्य योध्यास हातातच बॉम्ब फुटल्याने वीरमरण आले. अशा स्वातंत्र्ययोध्यांमुळेच आज आपण स्वातंत्र्य उपभोगत आहोत.

***

# लाईफ स्किल्स (जीवन कौशल्ये) २.० पुस्तकाचे प्रकाशन

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** - सीओईपी टेक्नॉलॉजिकल विद्यापीठ येथे ''लाईफ स्किल्स (जीवन कौशल्ये) २.० भाग पहिला'' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. हे पुस्तक प्रा. जीवन मुळे (माजी प्राचार्य, पॉलिटेक्निक कॉलेज)आणि डॉ. सौ. प्रीतम हेमंत सेलमोकर सहाय्यक प्राध्यापक,मेकॅनिकल अभियांत्रिकी विभाग,सीओईपी टेक यांनी संयुक्तपणे लिहिले आहे.

या पुस्तकाचे प्रकाशन प्रा.डॉ नितीन करमळकर, माजी कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या हस्ते सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या सभागृहात संपन्न झाले.या प्रसंगी प्रा.डॉ सुनील भिरुड, कुलगुरू सीओईपी टेक्नॉलॉजिकल विद्यापीठ, डॉ.डी. एन.सोनवणे, कुलसचिव, प्रा.पराग सदगीर, अधिष्ठाता, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, डॉ चेतन पाटील, अधिष्ठाता डॉ. प्रशांत बारटक्के, सहयोगी अधिष्ठाता, डॉ प्रदीप देशमुख विभाग प्रमुख संगणक



शास्त्र यांची मुख्य उपस्थिती होती.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला, ( -२०२०) अनुसरून विद्यापीठ अनुदान आयोगाने पदवीपूर्व विद्यार्थ्यांसाठी लाईफ स्किल्स-२.० हा विषय विशेषत्वाने निर्धारित केला आहे. हा विषय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचा उद्देश तरुण पिढीचा सर्वांगीण आणि शाश्वत विकास व्हावा व विद्यार्थी रोजगाराभिमुख व कौशल्याधिष्ठित घडेल तसेच आजची तरुणाई सामाजिकदृष्ट्या जबाबदार नागरिक व्हावी हा ह्या पुस्तक लिहिण्याचा उद्देश आहे. हे पुस्तक निर्धारित अभ्यासक्रमाशी निगडित असल्यामुळे पदवीपूर्व शिक्षण घेणारे विद्यार्थी, प्राध्यापक, शैक्षणिक संस्था यासाठी विशेष उपयुक्त आहे. प्रत्येक व्यक्तीला आपले जीवन यशस्वी समृद्ध जगण्यासाठी जीवन कौशल्यांची नितांत आवश्यकता असते. हे पुस्तक वाचून त्यांची गरज निश्चितपणे मार्गी लागू शकते. या पुस्तकाची चार भागात विभागणी करण्यात आली असून, संवाद कौशल्य, नेतृत्व व व्यवस्थापन कौशल्य, व्यावसायिक कौशल्य आणि वैश्विक मानवी मूल्ये याअंतर्गत १८ कौशल्ये सुस्पष्टपणे समजावून दिली आहेत.प्राचार्य जीवन मुळे आणि डॉ प्रीतम सेलमोकर यांचा शैक्षणिक क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव या पुस्तकात प्रतिबिंबित झालेला आहे.

प्रा जीवन मुळे हे सिव्हिल इंजिनियर इंजिनियर असून शासकीय तंत्रनिकेतन मध्ये अधिव्याख्याता ते प्राचार्य अशी ३५ वर्षे सेवा केली.त्यांची सिव्हिल इंजिनियरिंग मधील आठ पुस्तके तसेच उद्योजक्त, व्यवस्थापन, करियर या विषयावर दहा पुस्तके प्रकाशित झाले आहेत. तसेच दोनशे च्या वर लेख विविध दैनिक, दिवाळी अंक मध्ये लेख प्रकाशित झाले आहे. महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार,मराठवाडा भूषण पुरस्कार, बेस्ट पॉलिटेक्निक टीचर ऑफ महाराष्ट्र पुरस्कार, ज्ञानरत्न पुरस्कार इ पुरस्काराने प्रा जीवन मुळे यांना सन्मानित करण्यात आले आहे.

# श्री संत ज्ञानेश्वर ब्राह्मण संस्थेचा मासिक मेळावा उत्साहात



**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** - पिंपळे सौदागर येथील श्री संत ज्ञानेश्वर ब्राह्मण संस्थेचा मासिक मेळावा उत्साहात संपन्न झाला. शनिवार दि. १९ रोजी बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणाच्या परिसरात झालेल्या या मेळाव्याचा प्रारंभ निवृत्त जिल्हा न्यायाधीश कालीदास नांदेडकर तसेच प्रकाश जोशी यांच्याहस्ते दिपप्रज्वलन आणि ज्ञानेश्वर माऊलींच्या पुजनाने करण्यात आला. त्यानंतर शशांक खांडेकर, शशिकांत कुलकर्णी, सुरेंद्र पागेदार, शैलजा लोकरस, अनिल कुलकर्णी, अनघा वडनेरकर, माधुरी मुलमुले, स्नेहा चिंचवडकर, सुरेखा कुलकर्णी यांनी मराठी-हिंदी गाणी सादर केली. संस्थेचे ज्येष्ठ सदस्य प्रकाश मोदी यांनी यावेळी भविष्यकाळात संस्थेची प्रगती आणि शाश्वत विकासासाठी विविध उपक्रम राबविण्याचे आवाहन केले.

आषाढी एकादशी निमित्त पंढरपूरची वारी केल्याबद्दल रमेश भट, अनुराधा निलेगावकर आणि संतोष वर्तक, वासंती वर्तक यांना गुलाब पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. विलास जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या मेळाव्यात स्वच्छ भारत अभियानांतर्गत पिंपरी चिंचवडने देशात सातव्या तर राज्यात प्रथम क्रमांक पटकाविल्या बद्दल महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह, संबंधित प्रशासकीय अधिकारी आणि विविध पक्षांचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रमेश भट यांनी केले. सुत्रसंचलनाची जबाबदारी स्नेहा चिंचवडकर यांनी सांभाळली. राष्ट्रगीताने मेळाव्याची सांगता करण्यात आली.

# श्रीयश प्रतिष्ठानमध्ये भव्य रक्तदान शिबीर

**ज्योतिर्मय साहित्य**
**छत्रपती संभाजीनगर**

- मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त श्रीयश प्रतिष्ठान यांच्या वतीने भव्य ''रक्तदान यज्ञ'' या विशेष उपक्रमाचे आयोजन श्रीयश प्रतिष्ठान, छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. विजय फुलारी, कुलगुरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रमुख सन्माननीय पाहुणे म्हणून मानसिंग पवार, माजी अध्यक्ष, मसिआ व संस्थापक संचालक, रत्नप्रभा मोटर्स, हे लाभले होते. इतर मान्यवर पाहुण्यांमध्ये दिलीप थोरात, विकास कुलकर्णी, राजू पाटील, श्रीमती आवळे आवळे तसेच सलीम चिश्ती यांचा समावेश होता. कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक दीपप्रज्वलन, सरस्वती वंदना व मान्यवरांचे सत्कार याने झाली. श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष बसवराज मंगरुळे सरांनी आपल्या मनोगतात माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांना ''कर्तृत्ववान मुख्यमंत्री'' असे संबोधून त्यांच्या कार्याची प्रशंसा केली. त्यानंतर त्यांनी ''रक्तदान यज्ञ'' या संकल्पनेमागील सामाजिक महत्त्व विषद केले.

कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांनी शिबिराच्या उपक्रमाचे कौतुक करताना, मुख्यमंत्र्यांना '' खरे दूरदृष्टी असलेले नेतृत्त्व'' असे गौरवले आणि समाजोपयोगी कार्याबरोबरच शैक्षणिक उत्कृष्टतेकडे लक्ष देण्याची गरज अधोरेखित केली.

सन्माननीय पाहुणे मानसिंग पवार यांनी आपल्या भाषणात सांगितले की, मा. मुख्यमंत्र्यांच्या दूरदृष्टीपूर्ण प्रयत्नांमुळे छत्रपती संभाजीनगर आता समृद्धी महामार्गाद्वारे थेट जोडले गेले आहे, आणि हे शहर प्रगतीच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत आहे. विद्यार्थ्यांचा रक्तदानातील सहभाग सामाजिक जाणीवेचे उदाहरण असल्याचेही त्यांनी नमूद केले.

सत्य साई लॅबचे वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी अरुण वाकडिकर यांनी रक्तदान व थॅलेसेमिया या विषयांवर माहितीपूर्ण मार्गदर्शन केले.

रक्तदान यज्ञाचे उद्घाटन मा. कुलगुरू यांच्या हस्ते झाले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रक्तपेढीच्या डॉ. शितल काढाणे, संजिवनी ब्लड बँकेच्या डॉ. विद्या घोडके, तसेच सत्य साई ब्लड बँक यांच्या टीमने रक्तसंग्रहाचे कार्य यशस्वीपणे पार पाडले.

या रक्तदान यज्ञामध्ये श्रीयशचे अभियांत्रिकी, फार्मसी, एमबीए, बीसीए, पॉलिटेक्निक आणि आयुर्वेद महाविद्यालयाचे एकूण ५०२ विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी रक्तदान केले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठीश्रीयश प्रतिष्ठानचे मुख्याधिकारी कर्नल जॉय डॅनियल ह्यांचे मार्गदर्शन लाभले तसेच डॉ. गणेश तापडिया, प्राचार्य, श्रीयश फार्मसी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विजय भोरडे यांनी केले व प्रा. अनिल पालवे यांनी आभारप्रदर्शन केले. या वेळी सर्व कॉलेजचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शंकरराव भेलके महाविद्यालयात मा.ना.अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

**ज्योतिर्मय साहित्य**

**नसरापूर** - महाराष्ट्र राज्याचे कार्यशील उपमुख्यमंत्री व पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष नामदार अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त शंकरराव भेलके महाविद्यालयात वृक्षारोपण, पर्यावरण रांगोळी स्पर्धा, अजित स्पर्धा परीक्षा, प्लास्टिक कचरा संकलन असे विविध उपक्रम राबविण्यात आले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक भालचंद्र जगताप, भोर पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष मा. किरण भदे, श्री शिवाजी विद्यालय नसरापूरचे मुख्याध्यापक संजय यादव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुषार शितोळे उपस्थित होते.

वृक्षारोपण उपक्रमात आंबा, पेरू, जांभूळ, आवळा आदी स्थानिक झाडांची लागवड करण्यात आली. तसेच प्रत्येक झाडाचे संवर्धन करण्याची जबाबदारी निवडक विद्यार्थ्यांना देण्यात आली.




दरवर्षी राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमातून लावलेल्या झाडांमुळे महाविद्यालय परिसर हिरवळीने नटला आहे. रांगोळी स्पर्धेत विद्यार्थ्यांनी निसर्ग व संवर्धनावर आधारित आकर्षक रांगोळ्या साकारल्या. अजित स्पर्धा परीक्षा या नावाने घेण्यात आलेल्या सामान्यज्ञान व चालू घडामोडींवरील परीक्षेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. प्लास्टिक कचरा संकलन मोहिमेद्वारे परिसर स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील डॉ.जगदीश शेवते, प्रा. सहदेव रोडे, प्रा.पौर्णिमा कारळे, डॉ. रोहिदास ढाकणे, ग्रंथपाल प्रा.भगवान गावित, डॉ.सचिन घाडगे, प्रा.गणपत आवटे, प्रा.जीवन गायकवाड, प्रा.दयानंद जाधवर, प्रा.माउली कोंडे, प्रा.महेश कोळपे, प्रा.भूषण सामगीर, प्रा.ऐश्वर्या धुमाळ, प्रा.अंकिता महांगरे, विकास ताकवले, सुमित कांबळे इ. उपस्थित होते. कार्यक्रमासाठी विशेष श्रम शिपाई अभिषेक मोरे यांनी केले. या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षण, सामाजिक भान व स्पर्धा परीक्षांची तयारी याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

सदरील सर्व उपक्रमांचे आयोजन प्राध्यापक तसेच प्रशासकीय कर्मचारी यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुषार शितोळे यांच्या मार्गदर्शनाखाली केले.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559